**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2020, VOL- 8/61*

# कोविड19 काळातील शिक्षण

**Kamble Jotsna Mohan, Ph. D.**
*Associate Professor, Tilak College of Education, Pune- 30*
*jotsnasonawane@gmail.com*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

ऑनलाईन आणि ऑफलाईन यांचा मिलाफ असलेली ही संमिश्र शिक्षणपद्धत ह्याच प्रकारातील शिक्षणपद्धती सध्याच्या काळात अतिशय उपयुक्त ठरणार आहे .सध्या करोना च्या संकटामुळे शाळा महाविद्यालय बंद आहेत शाळा सुरू करण्यासाठी परिस्थिती निर्माण होईल हे नक्की सांगता येणार नाही जरी शाळा सुरू झाल्या तरी सामाजिक अंतराचे नियम कोणते असतील आणि ते तंतोतंत शाळा महाविद्यालय संस्था यांना पाहता येतील का? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. शासनाने ऑनलाईन शाळा महाविद्यालय सुरू करण्यासाठी ची परवानगी दिली आहे .अनेक शाळा ऑनलाईन पद्धतीने अध्ययन अध्यापनाचे कार्य करीत आहे. या सर्वांची पुढील वाटचालीसाठी कोणती दिशा असेल याचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे.

शिक्षक विद्यार्थी यांना ऑनलाईन शिक्षणाच्या बाबतीत विविध उपकरणे वापरून शैक्षणिक उपक्रम चालवणे उदाहरणार्थ मोबाईल लॅपटॉप यांचा वापर आपल्या व्यवस्थेसाठी एकदम नवीन आहे अशा परिस्थितीत ती उपकरणे वापरून शिकणे अथवा शिकविणे हे मार्ग सक्तीने स्वीकारायला लागले परंतु ऑनलाईन शिक्षणाच्या सुविधांमध्ये आपल्याकडे कोणकोणत्या प्रकारचे मार्ग आहेत हे पाहावे लागेल ग्रामीण भागातील तरुणांनी एकत्र येऊन सर्व गावासाठी विविध उपाय तयार केले आहेत खरे परंतु ते किती प्रमाणात यशदायी ठरतील हे सांगता येत नाही. शिक्षणाचे हे विविध घटक 1) अध्यापन

**2)अध्ययन 3) मूल्यमापन.**

अध्यापन- शिक्षक जेव्हा वर्गात अध्यापन करत असतो तेव्हा त्याच्याकडील अध्यापनाचे कौशल्य विकसित झालेले असतात त्याबाबतचे प्रशिक्षण झालेले असते त्यामुळे शिकवावे कसे ?वक्तृत्व ,विषय मांडण्याची कला, हे त्यामध्ये अंतर्भूत असते.

अध्ययन -विद्यार्थी स्वतः प्रयत्न करून  शिकतात त्यास आपण अध्ययन मानतो. अध्ययनासाठी लागणारी साधने विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असतात विद्यार्थी त्याच्या साह्याने शिकण्यासाठी जास्तीचा प्रयत्न करतात या प्रयत्नांना पूरक कार्य शिक्षक करत असतो .अनेक नवीन संकल्पना विद्यार्थी समजावून घेत असतात.

मूल्यमापन- अध्ययनात विद्यार्थी किती शिकला याची पडताळणी करण्याची प्रक्रिया म्हणजे मूल्यमापन होय.मुलांना दिलेले स्वाध्याय उत्तम तऱ्हेने विद्यार्थ्यांनी सोडविणे महत्त्वाचे असते मूल्यमापनासाठी विविध स्तरावर परीक्षा गृहकार्य

तपासणी, घटक चाचण्या घेणे इत्यादी कामे मूल्यमापन संदर्भात करावे लागतात याशिवाय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम खेळ स्पर्धा यांचे आयोजन वेगळेच असते ही सर्व पार्श्वभूमी स्पष्ट करण्यासाठी ची आवश्यकता का आहे तर सर्व प्रक्रियेला या संकटाने मोठी मुरड घालायला लावलेली आहे. सध्याच्या काळात सर्व परिस्थितीचा आढावा घेता बहुसंख्य शाळा अथवा प्रशिक्षणे फक्त ऑनलाईन करण्यावर भर देत आहेत तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा फायदा सर्व समाज विद्यार्थी शिक्षक घेत आहेत गूगल मीट,झूम या सारखे ॲप आपल्या शिक्षण व्यवस्थेचा थोडा भार हलका करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.या तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षक व विद्यार्थी यांचा कॉल सेट अप करून वर्गात जसे शिक्षक बोलतो, त्या पद्धतीत बोलून शिकवणे अशी सध्याची परिस्थिती दिसत आहे.काही कल्पक शिक्षक आपल्या अध्यापनाचे मुद्दे पावर पॉइंट प्रेझेंटेशन करून व्हिडिओ कॉल वर दाखवतात व विषयातील विविध संकल्पना समजावून सांगतात,अर्थात यामध्ये शिक्षकाचा काही दोष नाही.शिक्षकांचे प्रशिक्षण प्रत्यक्ष वर्गात झालेल्या असताना आणि वर्गात शिकवण्याचा अनुभव त्यांच्याजवळ असताना अचानक ऑनलाइन अध्यापन करावे लागणे हा त्याच्यासाठी प्रचंड मोठा बदल आहे. यासाठी सर्वांचे योग्य ते प्रशिक्षण झाले आहे असे नाही काही शिक्षकांना विशिष्ट प्रशिक्षणाचा ही लाभ मिळाला. ऑनलाईन शिकविण्याचे धडे कसे घ्यायचे याच्या अनेक व्हिडीओ ,अनेक युट्युब चॅनेलवर उपलब्ध आहे

यामुळे शिक्षण घेण्याची आणि देण्याची कवाडे ऑनलाइन तंत्रज्ञाने खुली करून दिले आहेत. शिक्षकाचे सादरीकरण काही वेळा ऑनलाइन अध्यापनात जास्त प्रभावित झाल्याचे दिसते विद्यार्थी सुद्धा काही प्रमाणात अचूक लक्ष देत असल्याची दिसते.अनेक तांत्रिक बाबी शिकायला मिळत आहे ऑनलाइन वर्ग अध्यापन यामुळे विद्यार्थ्यांची नाळ शिक्षणाशी जोडलेलीच राहिलीआहे. त्याच सर्व दृष्टीने फायदा करून घेणे विद्यार्थ्याच्या हातात आहे या माध्यमांचा योग्य वापर केला तर अनेक प्रकारचा फायदा विद्यार्थी वर्गाला होऊ शकतो परंतु समाजात थोडेसे वेगळे चित्र दिसायला लागले .विद्यार्थी अभ्यास विषयाकडे लक्ष न देता, ऑनलाइन खेळ व मनोरंजन याकडे लक्ष देऊ लागले आहेत. उदाहरणार्थ पॉर्न साईट. विविध वृत्तपत्रातून आपण त्याची आकडेवारी सुद्धा पाहतो आहे covid-19 2020 मध्ये चांगलाच वेग घेतला होता.हे संकट किती काळ राहील हे आजच्या घडीला ठामपणे सांगणे कठीण आहे मानवजातीच्या जीवावरच हे संकट घाला घालते आहे. भारतात आणि जगभर विविध साथीच्या रोगांची संकटे खूप आलेले आहेत मात्र अशा आपत्तीच्या वेळी आपत्ती निवारण यंत्रणा व्यवस्थापन करते. त्याचे विविध पर्याय शोधून त्या प्रकारे नियोजन करतो मात्र हे संकट नवीन आहे सध्या गरज आहे पारंपारिक शिक्षण पद्धतीला तंत्रज्ञानाच्या चळवळीची साथ घेऊन अध्ययन-अध्यापन प्रक्रिया या संकट काळात देखील कसे सुरू ठेवता येईल त्याचे एक दोन तीन पर्याय तयार करण्याची आवश्यकता वाटते. संकट ही संधी म्हणून प्रत्यक्ष कृती करणे महत्त्वाचे आहे. ऑनलाइन शिक्षणाचे धडे गिरवत असले तरी हे शिक्षण पालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे ऑनलाइन क्लास मध्ये लक्ष देण्यापेक्षा मुले व्हिडिओ गेम्स खेळण्याचे अधिक रमत आहेत यातच क्लासमध्ये मुलांकडून कॅमेरा बंद करून निघून जाणे,आवाज बंद करणे हे प्रकार एकीकडे घडत आहेत त्यामुळे ऑनलाइन शिक्षण देण्यास पालकांचा नकार येऊ लागला आहे.सध्याच्या टेक्नोसॅव्ही युगात मुले अधिकच स्मार्ट झाल्याने किती पासवर्ड ठेवले किंवा बंदी केली तरी

मुलांना हवे ते पाहण्याची तंत्र अवगत असल्याचे अनेक पालकांचे निरीक्षण आहे. 24 तास मुलांवर नजर ठेवणे अशक्य आहे त्यामुळे मुलांना अशा गोष्टी पासून कसे लांब ठेवायचे याची सुद्धा पालकांना चिंता आहे. शाळा बंद असल्याने मुलांसोबतच पालकांवर ही मानसिक ताण वाढू लागलेला आहे.ऑनलाइन शाळा मुलांप्रमाणेच पालकांसाठी सुद्धा डोकेदुखी ठरत आहे मुलांच्या शाळा मुलांच्या शाळांच्या वेळा घरातील कामांची गडबड ऑफिसला जाण्याची किंवा वर्क फ्रॉम होम ची लगबग सांभाळताना पालकांची पण कसरत होत आहे.मुलांचे ऑनलाईन क्लास मधे लक्ष न लागणे अभ्यासात एकाग्रता नसणे, वाढलेला स्क्रीन टाईम, मुलांच्या अभ्यासावर होणारा परिणाम, अभ्यासावरून होणारे वाद, कुटुंबात निर्माण होणारा ताण यामुळे मुलांप्रमाणेच पालकांचे सुद्धा मानसिक आरोग्य बिघडत आहे. छोटा स्क्रीन चौकटीतील शाळेचा स्वीकार ,अजून आपल्या नेत्यांच्या अंगवळणी पडलेला नाही त्यामुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. मर्यादित वेळेत लेक्चर संपवायचे असल्याने शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यांकडे लक्ष देऊ शकत नाही त्यामुळे ऑनलाईन शाळेमध्ये मुलांच्या बर्याच संकल्पना स्पष्ट होत नाहीत.सोशल गॅदरिंग नसल्यामुळे घरून काम सुरू असल्यामुळे पालक अडकून पडले आहेत त्याचा राग मुलांवर निघतो आहे मुले ही कायम स्क्रीन समोर असल्याने त्यांचे बाहेर जाणे मित्र-मैत्रिणींना भेटणे बंद आहे यातून मुलांमध्ये नैराश्य व सुरक्षितता संभ्रम यांचे मिश्रण पाहायला मिळत आहे.पालकांनी मुलांची भावनिक आंदोलने समजून घ्यायला हवीत भावनिकदृष्ट्या त्यांच्या बरोबर असावे,मुलांच्या स्क्रीन टाईम चे वेळापत्रक ठरवणे गरजेचे आहे.आता लोक डाऊन शिथिल होत असला तरी मुलांना एखादे वेळी बाहेर फिरायला घेऊन जावे त्यांच्या अडचणी संवाद साधून समजून घेण्याचा प्रयत्न करावा. सतत चिडचिड हे त्याचे पहिले लक्षण असते पालक किंवा मुले कोणीही निराश न होता हेही दिवस जातील या वरील विश्वास दृढ असावा. पालकांच्या समस्या दोन लेक्चरच्या मधल्या वेळेत किंवा ब्रेकमध्ये मुले काय करत बघत आहेत यावर लक्ष ठेवावे लागते मुले शाळा सुरू असताना स्क्रीन टच करून मध्येच गेम खेळतात त्यांना सातत्याने त्यांच्या पासून परावृत्त करावे लागते. मुले लहान असली तरी पालकांना शाळा सुरू असेपर्यंत पूर्णपणे त्यांच्यासोबत बसून राहावे लागते मुलांना शाळेत शिकलेले फक्त 10 ते 20% समजते ही मुलांचे ही समस्या आहे. मुलांच्या शालेय आयुष्यातील शेवट हरवल्याने त्यातून नैराश्य आले आहे. मुले कायम स्क्रीन समोर असल्याने त्यांचे बाहेर जाणे मित्र-मैत्रिणी भेटणे बंद आहे मुले पहिल्यांदाच अशा परिस्थितीचा सामना करत आहेत ऑनलाईन शाळेमध्ये संवादावर शंका विचारण्यास अनेक बंधने येतात त्यामुळे अभ्यास डोक्यावर जातो..

वरील सर्व समस्यांचा विचार करता विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास योग्यप्रकारे होणे आणि त्यांच्या क्षमतांचा विकास पूर्णपणे होणे यात या संकटाने व्यत्यय आलेला दिसतो. शिक्षणक्षेत्रात शासकीय पातळीवर नित्य बदल होत आहेत शिक्षण हक्क कायदा,सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, ज्ञानरचनावाद , इत्यादी गोष्टींना आपण सर्व जण सामोरे जात आहोत. कृतीला महत्त्व आहे म्हणूनच प्रत्येक पाठाच्या खाली अनेक कृती दिलेल्या आता आपल्याला आढळतात.शिक्षण म्हणजे पाठ्यपुस्तके शिकून अभ्यासक्रम पूर्ण करणे पण यातून विद्यार्थ्यांचा भावनिक बौद्धिक,मानसिक,शारीरिक विकास होईलच असे आपल्याला सांगता येत नाही .अभ्यासक्रम पूर्ण करताना मुलांच्या क्षमतांचा विकास साधला जावा यासाठी आपली शिक्षण व्यवस्था अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. या

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

क्षमतांचा विकास करण्याकरता शाळा अथवा महाविद्यालयांमध्ये शिक्षक व विद्यार्थी वेगवेगळ्या नाविन्यपूर्ण उपक्रम यांचा वापर करून मुलांच्या क्षमतांचा विशिष्ट कलाने विकास व्हावा यासाठी प्रयत्न करत असतात.व्याख्याने गटचर्चा प्रश्नोत्तरे किंवा दृकश्राव्य साधने इत्यादी पद्धतींचा वापर करत हे असे वेगवेगळे प्रयोग करत असतात.समस्या मांडली तर त्याच्या निराकरणासाठी आपण प्रयत्न करणार असेच प्रयत्नशील शिक्षकांमुळे व विद्यार्थी यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारांना गती मिळते योग्य दिशा मिळते आणि शिक्षण शेवटी आनंददायी ठरत असते. शाळेत शिक्षक रुजू झाला की त्याला समूहातून खूप शिकायला मिळते .सहकारी मित्र यांचे कडून, कामाचे निरीक्षण,चर्चा ,कृती,प्रयोग यातून त्यांच्या विचारांना वेगळी दिशा मिळते .अशा संकटामुळे या उपक्रमांना आपोआपच धक्का बसलेला आहे. शिक्षकांसमोर प्रत्यक्ष विद्यार्थी कुणीही नाही अध्यापनासाठी ऑनलाइन शिक्षण सुरू त्यातही प्रत्येक विद्यार्थ्याकडे ऑनलाइन शिक्षणासाठीचे योग्य वातावरण अथवा साधनांची उपलब्ध असेलच असे नाही असे विविध प्रकारची आव्हाने आपल्यासमोर आहेत आणि या आव्हानांना तोंड देणे हे सध्या महत्त्वाचे ठरत आहे.

**संदर्भ**

*जुलै 2020 या महिन्यातील विविध वृत्तपत्रे.*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*